# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१
Web:www.jdhepune.info
E_mail ID- admin@jdhepune.info
फोन नं.०२०-२६१२७८३३
फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/संकिर्ण/२७-६-१३/नि/२०२२ /936

दि.१२-०४-२०२२

प्रति,
प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,
विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन, त्यांना अनुषंगिक लाभ देणेबाबत...

संदर्भ:- शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकिर्ण-२०१२/(१३२/१२)/विशि-१, दि.२७ जून, २०१३.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देणेबाबतचा निर्णय शासनाने संदर्भिय शासन निर्णयान्वये घेतलेला आहे.

सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.१६ नुसार दि.२३-१०-१९९२ ते ०३-०४-२००० या कालावधीतील अध्यापकांची प्रकरणे गुणवत्तेवर तपासण्यासाठी कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणे गुणवत्तेवर तपासणी करण्यासाठी संबंधित अध्यापकांच्या मूळ नियुक्ती संदर्भातील सर्व दस्तऐवज / अभिलेख (बिंदूनामावली, जाहिरात, ना-हरकत प्रमाणपत्र, निवड समिती अहवाल, नियुक्ती आदेश, रुजू अहवाल, विद्यापीठ मान्यता व शैक्षणिक कागदपत्रे इ.) मूळ सेवापुस्तकासह **दि.२९-०४-२०२२ पर्यंत** या कार्यालयामध्ये **हस्तपोहोच** सादर करण्यात यावीत. जेणेकरुन उक्त प्रकरणी नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करणे या कार्यालयास सोईचे होईल.

**(डॉ.किरणकुमार बोंदर)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:- मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.